**प्रेसनोट दिनांक १२/०४/२०१९**

**विमाननगर पुणे येथील टॅन्सी वेलनेस स्पा, अे/२, पेशवा कॉम्पलेक्स पुणे येथे छापा टाकुन ३ परदेशी महिलांची वेश्या व्यवसायातुन सुटका करुन केले बाबत....**

दिनांक १०/०४/२०१९ रोजी मा. सहा. पोलीस आयुक्त गुन्हे -२ श्री भानुदास बर्गे यांना त्यांचे गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, टॅन्सी वेलनेस स्पा, अे/२, पेशवा कॉम्पलेक्स विमाननगर पुणे येथे मसाजचे नावाखाली वेश्या व्यवसाया चालत आहे,अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने त्यांचे मार्गदर्शनाखाली विमानतळ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील, सामाजिक सुरक्षा विभागाचे महिला पोलीस निरीक्षक,मनिषा झेंडे,महिला सहा.पोलीस निरीक्षक अश्विनी जगताप, पोलीस उप निरीक्षक व्यवहारे, पोलीस हवा. ५७४३ तुपे, पोलीस हवा. २४३५ देवकर, पोना/३३८४ ननावरे, विमानतळ पोलीस स्टेशनकडील पोलीस हवा.४५७७ खांदवे, महिला पोलीस नाईक ६२५७ पवार पोलीस नाईक १९५१ संकपाळ, पोशि ७४१९ जाधव, महिला पो शि.९४८२ फापाळे यांचेसह टॅन्सी वेलनेस स्पा, अे/२, पेशवा कॉम्पलेक्स विमाननगर पुणे येथे २०/३० वाजता छापा टाकुन आरोपी नामे १. रंजनकुमार राजकिशोर पासस्वान वय २८ वर्षे रा. एस स्काय हाईटस, बी /३०४, उंड्री पिसोळी ता. हवेली जि पुणे मुळगांव -मु.पो.तेलाड, तहसिल अगिया बाजार, जिल्हा भोजपुर बिहार २. पाहिजे आरोपी गौतम घाडगे हे थायलंड देशाच्या तीन महिला यांची वेश्या व्यवसायातुन सुटका करण्यात आलेली आहे. महिला पोलीस नाईक ६२५७ पवार विमानतळ पोलीस स्टेशन यांनी वरिल नमुद आरोपींचे विरुदध अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमचे कलम ३,४,५ भा.दं.वि.कलम ३७०, ३७०(अ) प्रमाणे फिर्याद दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि नंबर १८३/२०१९ दाखल करण्यात आलेला आहे. आलेली असुन आरोपी नामे रंजनकुमार राजकिशोर पासस्वान वय २८ वर्षे रा. एस स्काय हाईटस, बी /३०४, उंड्री पिसोळी ता. हवेली जि पुणे मुळगांव -मु.पो.तेलाड, तहसिल अगिया बाजार, जिल्हा भोजपुर बिहार यास दिनांक ११/०४/२०१९ रोजी ००/२० वाजता अटक करण्यात आलेली असुन पाहीजे आरोपी नामे गौतम श्रीधर घाडगे वय ३३ वर्षे रा. तेलकुडगांव ता. नेवासा जि. अहमदनगर यास दिनांक ११/०४/२०१९ रोजी २०/३० वाजता अटक करण्यात आलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक गुन्हे श्री बळवंत मांडगे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत. सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे शाखा पुणे शहर व विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी ही सयुंक्तीक कारवाई केलेली आहे.

**(बळवंत मांडगे)**
**पोलीस निरीक्षक,(गुन्हे)**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**